पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२५/२०१८
दिनांक : ०७/०७/२०१८

प्रति,

मा.......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **१३/०७/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१३/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -४११ ०१८
मा.क्रीडा, कला, क्रीडा, व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०५**

**दिनांक : १३/०७/२०१८** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१३/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २२/०६/२०१८ व २५/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु. नुपुर लक्ष्मण मोरे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. सौ.रूपाली गणेश तरवडे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि. २९ ते ३१ जुलै २०१८ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१८-१९ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट ) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/-(अक्षरी र.रु.तिन लाख ब्याऐंशी हजार नऊशे साठ फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स

बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर,पंच मानधन,पंच चहा अल्पोपहार खर्च,नारळ,पूजा खर्च,सत्कारार्थ पुस्तके खरेदी, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा उपस्थित क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक, पाहुणे यांचा चहापान-अल्पोपहार खर्च, पाहुणे सत्कारार्थ बुके खरेदी, साहित्य भाडेपोटी खर्च,नाट्यगृह भाडे इतर खर्च इ.,सन २०१८-१९ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे १५० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर ७५,राष्ट्रीय पातळीवर २५ शालेय खेळाडू,त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च,दैनिक भत्ता,प्रवेश फी, औषध खर्च इ.अदा करणे कामी अंदाजे र.रु.५०,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.२५,२५,१००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख पंचवीस हजार शंभर फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी- वार्षिक स्पर्धा क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य या २ लेखाशिर्षावर केलेल्या अनुक्रमे प्रत्येकी र.रु.२०,००,०००/- प्रमाणे एकूण तरतूद र.रु. ४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने मंडप,बैठक व्यवस्था,मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे.त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२५/२०१८
दिनांक : ०७/०७/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.